**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्र्यांचा मन की बात द्वारे देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद- कपड्यांमुळे तयार होणाऱ्या कचऱ्याबद्दल व्यक्त केली चिंता

- नागपूरमधे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वर्षप्रतिपदा उत्सवात प्रधानमंत्र्यांचा सहभाग/ रेशीमबाग आणि दीक्षाभूमीला भेट देऊन वाहिली आदरांजली

- गुढीपाडवा आणि नववर्ष सणांचा देशभरात उत्साह

**आणि**

- केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते बिहारमधे ८०० कोटी रुपये खर्चाच्या विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरच्या 'मन की बात' कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे विसावा भाग होता. महाराष्ट्रातल्या गुढीपाडव्यासह, देशभरात विविध ठिकाणी येत्या काही दिवसात नववर्षाच्या स्वागतासाठी साजऱ्या होणार असलेल्या रोंगाली बिहू, पोईला बोइशाख, नवरेह सणाच्या, तसंच ईदच्याही शुभेच्छा त्यांनी दिल्या.

**होल्ड बाईट**

परीक्षा संपून लागलेल्या उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विद्यार्थी आणि युवा वर्गानं नवी कौशल्ये शिकावीत यावर त्यांनी आजच्या मन की बात मध्ये भर दिला. या काळात मुलांनी तंत्रज्ञान, नाट्यकला, पर्यावरणासह विविध विषयांवरची शिबीरं तसंच सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हावं असं आवाहन त्यांनी केलं. कोणत्याही संस्था, शाळा अथवा विज्ञान केंद्रांनी आयोजित केलेल्या उन्हाळी उपक्रमांची माहिती MyHolidays या हॅशटॅगसह सामायिक करावी असं आवाहनही त्यांनी

केलं. या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी उन्हाळी सुट्टीसाठी तयार केलेल्या MY-Bharat या दिनदर्शिकेची माहिती दिली.

उन्हाळा सुरु झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बातमध्ये जल संवर्धनावरही भर दिला. यानिमित्तानं त्यांनी कॅच द रेन या मोहीमेची माहिती दिली. ही मोहीम सरकारची नसून समाजाची, जनता जनार्दनाची मोहीम आहे, असं त्यांनी सांगितलं. या मोहीमेअंतर्गत गेल्या ७ ते ८ वर्षांत पावसामुळे वाहून जाणारं ११ अब्ज घनमीटरपेक्षा जास्त पाणी वाचवण्यात आल्याची माहिती दिली. या मोहीमेअंतर्गत विविध राज्यांमध्ये सुरू असलेल्या प्रयत्नांची उदाहरणं त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. सामुदायिक पातळीवर जलसंवर्धनाच्या मोहिमांमध्ये सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं. यासोबतच उकाडा वाढत असल्यानं पक्ष्यांसाठी पाण्याचं भांडं ठेवण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

अलिकडेच झालेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये दिव्यांग खेळाडूंनी केलेल्या कामगिरीचीही प्रधानमंत्र्यांनी प्रशंसा केली. या खेळाडूंनी आपल्या प्रतिभेनं पुन्हा एकदा आश्चर्यचकीत करत १८ राष्ट्रीय विक्रम मोडले, यांपैकी १२ विक्रम महिला खेळाडूंनी केल्याची माहिती त्यांनी दिली.

यानिमित्तानं तंदुरुस्तीविषयी बोलतांना त्यांनी दिल्लीमध्ये आयोजित फिट इंडिया कार्निव्हलविषयी सांगितलं. आपापल्या परिसरात अशा प्रकारचे कार्निव्हल आयोजित करण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला केवळ १०० दिवस उरले असल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी करून दिलं. आंतरराष्ट्रीय योग दिन ही भारतानं जगाला दिलेली अनमोल भेट आहे असं ते म्हणाले. यानिमित्तानं त्यांनी सर्वांना आपल्या दिनचर्येत योगाभ्यासाचा अंतर्भाव करण्याचंही आवाहन केलं, यावेळी प्रधानमंत्र्यांनी जगभरात भारतीय समुदाय आपल्या सांस्कृतिक संवर्धनासाठी करत असलेल्या कामांची उदाहरण त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. पर्यावरणासाठी धोकादायक ठरत

असलेल्या टेक्स्टाईल वेस्ट अर्थात कपड्यांपासून निर्माण होत असलेल्या कचऱ्यांच्या नव्या आव्हानाविषयी देखील प्रधानमंत्र्यांनी चर्चा केली. असा कचरा निर्माण करण्यात आज भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर असल्याची जाणिव त्यांनी श्रोत्यांना करून दिली. मात्र यावरही अनेक स्टार्टअप्स आणि संस्था उपाय शोधत आहेत, शाश्वत फॅशन आणि कचरा व्यवस्थापनासाठी अभिनव पद्धतीनं काम करत आहेत असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नागपूर इथल्या माधव नेत्रालयाच्या प्रीमियम सेंटरचं भूमिपूजन झालं. नागपुरात माधव नेत्रालय गोळवलकर गुरूजी यांच्या आदर्शानुसार लाखो लोकांची सेवा करत असून नागपुरात आज आपण एका पुण्यसंकल्पाचे साक्षीदार बनत आहोत, असं यावेळी ते म्हणाले. देशवासियांना चांगल्या आरोग्य सुविधा देणं ही आपली प्राथमिकता आहे, आयुष्मान भारत सारख्या योजनांद्वारे नागरिकांना मोफत उपचार दिले जात आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड - बाईट...**

वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढली आहे, मेडिकलच्या जागा वाढल्या आहेत, जास्तीत जास्त आणि चांगले डॉक्टर तयार करणं हे सरकारचं ध्येय असल्याचं मोदी म्हणाले. योग आणि आयुर्वेदाला जगात ओळख मिळाली असून यामुळे भारताचा गौरवात भर पडली असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कामाचं कौतुक केलं. ज्याप्रमाणे संतांनी समाजाला नवी ऊर्जा देण्याचं काम केलं तसंच डॉ हेडगेवार आणि गोळवलकर यांनीही समाजाला ऊर्जा दिली. संघ अंतरदृष्टी आणि बाह्यदृष्टीसाठी काम करणारी संघटना आहे असे गौरवोद्गार प्रधानमंत्र्यांनी काढले.

पूर, भूकंप किंवा कोणत्याही संकटात मदत करण्यासाठी संघाचे स्वयंसेवक तत्पर असतात, स्वयंसेवक नेहमीच निस्वार्थीपणे काम करतात, असं प्रधानमंत्री म्हणाले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी ‘तमसो मा ज्योतिर्गमय’ या पुस्तकाचं प्रकाशनही केलं.

दृष्टिहीनांना दृष्टी देण्यासारखं मोठ कार्य नाही, हे नेत्रालय केवळ महाराष्ट्रासाठीच नाही, तर संपूर्ण मध्य भारतासाठी उपयोगी संस्था ठरेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ इतरांसाठी कष्ट करतो, स्वतःसाठी कोणताही अपेक्षा ठेवत नाही असं सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले. संघाचे स्वयंसेवक एक ध्येय ठेवून पुढे वाटचाल करत असल्याचं त्यांनी सांगितलं. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हेही उपस्थित होते.

त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागपूर मधल्या रेशिमबाग भागातील स्मृती मंदिराला भेट दिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ केशव बळीराम हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर यांच्या स्मृतीस्थळांना प्रधानमंत्र्यांनी आदरांजली वाहिली. त्यानंतर दीक्षाभूमीवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकावर जाऊन मोदी यांनी डॉ आंबेडकरांना आदरांजली वाहिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आज सकाळी नागपूर मधल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झालं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे त्यांच्या स्वागताला उपस्थित होते.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत. चैत्र शुक्लादी, युगादी, चैती चांद, नवरेह, चेराओबा या सणांनिमित्त देखील त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय नववर्षाची सुरुवात असलेले हे सण भारताची सांस्कृतिक विविधता

दर्शवतात आणि सामाजिक एकता वाढवतात असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

नवीन वर्षाची सुरुवात करणारे हे सण नवता, समृद्धी आणि आशा यांचं प्रतीक असून सर्वांना निसर्गाशी जोडतात असं उपराष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

नव्या संवत्सराचा हा सण सर्वांच्या जीवनात नवीन उत्साह आणेल आणि विकसित भारताच्या संकल्पाला ऊर्जा मिळेल, अशी आशा प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा देताना व्यक्त केली.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनीही गुढीपाडव्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर येत असलेला हा पहिला गुढी पाडवा सर्वांनी उत्साहाने साजरा करावा, असं त्यांनी म्हटलं आहे.

विकासाची महागुढी उभारू या, असं आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या नागरिकांना गुढीपाडव्याच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या आहेत. हे नववर्ष नागरिकांच्या जीवनात धनधान्य, पशुधनाची समृध्दी आणि भरभराट तसंच निसर्गाची कृपा घेऊन येवो, अशी प्रार्थनाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय  गृह मंत्री अमित शाह यांनी आज बिहारमधे सुमारे आठशे कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन केलं. सहकार मंत्रालयाच्या अखत्यारीतल्या १११ कोटी रुपये खर्चाच्या आणि नगरविकास आणि गृहनिर्माण खात्याच्या अखत्यारीतल्या ४२१ कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचा त्यात समावेश आहे. पोलिसांसाठी च्या सदनिकांचं तसंच ३ महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामाची कोनशिला त्यांनी बसवली.

दरभंगा इथल्या मच्छिमार सहकारी संस्थेत मखाणा प्रक्रीया उद्योगाचं उद्घाटन त्यांनी दूरस्थ पद्धतीने केलं. बिहार राज्य सहकारी बँकेच्या मायक्रो एटीएमचं वाटप त्यांनी बँक मित्रांना केलं. बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार आणि इतर नेते कार्यक्रमाला उपस्थित होते. शहा यांची आज गोपालगंज इथं जाहीर सभा होणार आहे.

**<><><><><>**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध सनराईजर्स हैद्राबाद हा सामना  विशाखापट्ट्णम इथं दुपारी साडेतीन वाजता होणार आहे.दुसरा सामना राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या संघांमधे गुवाहाटी इथं होईल. खेळ संध्यासाळी साडेसात वाजता सुरु होईल.

कालच्या सामन्यात  गुजरात टायटन्स संघानं  मुंबई इंडियन्सवर ३६ धावांनी मात केली. गुजरात टायटन्सने ८ बाद १९६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल  मुंबई इंडियन्सला २० षटकांत ६ गडी गमावून १६० धावा करता आल्या.

**<><><><><>**

राजस्थान आज ७६वा स्थापना दिन साजरा करत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. राजस्थानातल्या दीर्घोद्योगी लोकांनी जगभरात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.  असं त्यांनी शभेच्छा संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही राजस्थानातल्या जनतेला स्थापनादिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. स्थापनादिनानिमित्त राज्यात सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत.

मुंबईत राजभवन इथं राजस्थानच्या स्थापना दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात पोलिसांनी कोडीन या बंदी असलेल्या घटकापासून तयार केलेल्या कफ सिरपच्या २३८ बाटल्या जप्त केल्या आहेत. या सिरपची किंमत ५३ हजार रुपयांपेक्षा जास्त आहे.

<><><><><>

महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि कर्नाटकातल्या उत्तर भागात पुढच्या आठवड्यात मेघगर्जनेसह गारांचा पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. पश्चिम बंगाल आणि ओदिशात आज उष्णतेची लाट असण्याची शक्यता आहे. इशान्य भारतात पुढील तीन चार दिवस  कमाल तापमानात अंदाजे पाच ते सहा अंश सेल्सिअसने वाढ होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//